# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/11/2022 (गुरूवार) सायंकाळ


---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल

पो.स्टे. खापा :— अंतर्गत १४ कि.मी अंतरावरील मौजा वाकी शिवार येथे दिनांक २४/११/२०२२ चे १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती मिना हरीदास मानकर, वय ३९ वर्ष, रा. माळा क्वार्टर नं. ३६, झिंगाबाई टाकळी नागपूर यातील आरोपी नामे— मुकेश अंबिका बिंध, वय २६ वर्ष, रा. इको बॅक, हनुमान मंदीर जवळ, सिल्लेवाडा याने मोबाईल फोनव्दारे फिर्यादी हिला वाकी येथे दर्शनाकरीता जाऊ असे बोलुन तिला झिंगाबाई टाकळी, नागपूर येथे बोलावुन येथुन दोघे सोबत ॲटोन पाटणसांवगी वाकी येथे उतरून सोबत पायदळ वाकी येथे जात असतांना गंगाजी बाबा मंदीर येथे बोलत असतांना यातील आरोपी याने आपल्या जवळील चाकु काढुन फिर्यादी हिचे तोंड दाबुन गळयावर छातीवर मारून जखमी केले. फिर्यादीला जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मानकर, पोलीस स्टेशन खापा, मो. नं. ९४२२९४२७६४ हे करीत आहे.

## अपघाताची पाहणी करायला गेलेल्या पोलीसालाच कारने चिरडले.

पो.स्टे. पारशिवनी:— अंतर्गत ०१ किमी अंतरावर नयाकुंड शिवार, ए. एच. ७५३ खंडेलवाल मॅगनीज कंपनी जवळ दिनांक २३/११/२०२२ चे २१.०० वा. दरम्यान कार क्र. एम. एच.—४०/सी. एच—६३९३ चा चालक आरोपी नामे— रोशन रामदास पाटील, वय ३२ वर्ष, रा. आंबेडकर नगर, वार्ड नं. ०१ चिचोली खापरखेडा व त्याचे सोबत मित्र नामे कुणाल शेंडे, रा. पांजरा, याचे सोबत रामटेक येथील साई सबुरी बारमध्ये दारू पिवुन दारूच्या नशेत गाडी चालवुन आपली कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन नमुद घटनास्थळी कर्तव्यावर हजर असलेले पोलीस हवालदार जयंत शेरेकर, हे अपघाताच्या घटनेचा मोका पंचनामा करीत असतांना आरोपी कार चालकाने पोलीसांसह ०८ लोकांना उडविले. यात एक पोलीस हवालदार मृतक नामे— जयंत विष्णु शेरेकर, वय ४२ वर्ष, रा. रनाळा कामठी व ०७ जण गंभीर जखमी झाले. मृतक हे पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कार्यरत होते. यातील जखमी नामे— १) चंदप्रकाश टेकाडे, वय ३२ वर्ष, रा. नयाकुंड, २) अमोल कनोजे, वय ३० वर्ष, रा. पारशिवनी, ३) विक्रसिंग भैस, वय ४५ वर्ष, रा. नयाकुंड, ४) आकाश कोलांडे, वय २५ वर्ष, रा. मेहंदी, ५) संदीप तिजारे, वय ३५ वर्ष, रा. मेहंदी, ६) गौरव पनवेलकर, वय ३२ वर्ष, रा. पारशिवनी, ७) सागर सायरे, वय ३८ वर्ष अशी जखमींची नावे आहेत. जखमींना नागपूर येथील शायकीय वैद्यकीय महाविदयालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले असुन उपचार सुरू आहे.

सदर गुन्हयातील नमुद आरोपी कार चालक हा नमुद आरोपी कारचालक हा अपघात झाल्यानंतर जखमींना मदत न करता मोक्यावरून पळुन गेला. व फरार होण्याचे तसेच अटक टाळण्याचे उद्देशाने नातलगांचे घरी लपुन राहला

असता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीस ताब्यात घेवुन पोस्टे ला सादर केल्याने नमुद आरोपीस सदरहु गुन्हयात अटक करण्यात आली. आरोपीची ग्रामीण रूग्णालय पारशिवनी येथुन मद्यप्राशन केलेबाबतची तपासणी करण्यात आली असुन वैद्यकीय अहवालात आरोपीने मद्यप्राशन केल्याबाबत नमुद केलेले आहे. गुन्हयाचे अधिक तपासात आरोपी तसेच त्याचेसह कारमध्ये बसलेला त्याचा मित्र यांना गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी त्यांच्या मित्रासह खिंडसी रो, रामटेक व मनसर येथील बियर बारमध्ये मद्यप्राशन केले व मद्याचे अंमलात भरधाव वेगाने वाहन चालवल्यामुळे एखादयाचा जिव जावु शकतो, याची पुरेपुर जाणीव असतांनासुद्धा अपघातामुळे रोडवरील दुतर्फा वाहनाच्या रांगा लागुन रोडवर लोकांची गर्दी जमा झाल्याचे व त्यामुळे वाहतुक कोंडी होवुन पोलीस यंत्रणा सदर वाहतुक कोंडी सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसुन सुद्धा यातील आरोपीने मद्यप्राशन करून आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन रोडवरील गर्दीतल्या लोकानां व कर्तव्यावरील पोलीसांना धडकविले. ज्यामुळे एका पोलीसाचा मृत्यु झाला. तसेच ०५ नागरीक गंभीर व किरकोळ जखमी झाले. तसेच आरोपीने गर्दीतील लोकानां धडक दिल्यानंतर आरोपीने त्याचे वाहन पुढे रस्त्याच्या कडेला उभी असलेली महिंद्रा बोलेरो क्र एम.एच./४० ए.आर. २७६६ ला मागुन धडक देवुन सदर वाहनाने नुकसान केलेले असल्याने सदर गुन्हयात स्टे. डा. क्र. २७/२२ वेळ १७. १८ वा. भांदवि. चे कलम ३०४(अ) ऐवजी भांदवि चे कलम ३०४( भाग ०२) व ४२७ अन्वये कलमवाढ करण्यात आलेली आहे. आरोपीला न्यायालयातुन ०५ दिवसाची पोलीस कोठडी मिळाली असुन गुन्हयाचा पुढील तपास हा नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद (भा.पो.से.), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संदीप पखाले सा. , यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सोनवणे पोलीस स्टेशन पारशिवनी मो क्र ७०२०५७७४५९ हे करीत आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**